शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,

पिपरी, वर्धा – ४४२००१

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त पथक - २०१६

# नियमित उपक्रम

## २०२१ – २०२२

**डॉ. राजेश देशपांडे**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

**डॉ. पुरूषोत्तम कालभूत**
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी-वर्धा

(विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त पथक)

# राष्ट्रीय सेवा योजना पथक

## नियमित उपक्रम अहवाल २०२१–२०२२

सत्र २०२१-२०२२ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांना जून २०२१ पासून प्रारंभ झाला. नियमित उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दीष्ट्ये, स्वयंसेवकाची कर्तव्ये, स्वयंसेवकाची आचारसंहिता, स्वयंसेवकाची सामाजिक बांधिलकी इत्यादींबाबत त्यांच्यात जागृती निर्माण करून युवक युवतींना राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी केले जाते.

### आंतरराष्ट्रीय योग दिवसः

महाविद्यालयात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून रासेयो पथक व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाद्वारा साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुशील चव्हाण यांनी प्राणायाम व आसनांची शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच आसन व प्राणायाम यांचे महत्त्व सांगून यामध्ये नियमितता असल्यास चांगल्या प्रकारे लाभ मिळतो. म्हणून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले आरोग्य उत्तम ठेवण्याकरिता आसन व प्राणायाम नियमितपणे करण्यास भर द्यावा असे आवाहन केले. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. तेजस्विता कुंभरे हिने विविध आसने प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखविले. प्रा. डॉ. पुरूषोत्तम कालभूत यांनी प्राणायाम व योगासने यांना आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग केल्यास आरोग्य सुदृढ राहाते व जीवनातील आनंदाची अनुभूती मिळते असे सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

### स्वच्छता पंधरवडा :

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ०१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आपापल्या घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करावा अशी सूचना देण्यात आली होती त्यानुसार काही विद्यार्थ्यांनी आपापल्या घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला तर काही विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात सहभाग घेतला.

### रा.से.यो. वर्धापन दिन

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने २४ सप्टेंबर हा दिवस रा. से. यो. वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी छात्रसेवकांना रा. से. यो. शपथ देण्यात आली. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी मार्गदर्शन करताना रा. से. यो. च्या निर्मिती व कार्याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन रा. से. यो.

कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलींद माने यांनी केले. ऑनलाईन कार्यक्रमात दोन शिक्षक व २० विद्यार्थी सहभागी झाले होते.

### माझी वसुंधरा प्रतिज्ञा :

महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी www.nssmaharashtra.org.in या वेब पोर्टलवर नोंदणी करून 'माझी वसुंधरा मित्र ई-प्रतिज्ञा' प्रमाणपत्र प्राप्त केले.

### स्वच्छता अभियान :

ऑक्टोंबर महिन्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले यात विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर व आपापल्या गावात स्वच्छता अभियान राबवून कचरा व प्लास्टिक निर्मूलन अभियानात भाग घेतला व परिसर स्वच्छता केली.

### राष्ट्रीय एकता शपथ :

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता शपथ' घेण्यात आली याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे प्रा. मिलिंद माने व विद्यार्थी उपस्थित होते.

### राष्ट्रीय युवा दिन :

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्य 'राष्ट्रीय युवा दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे, प्रा. मिलिंद माने व प्रा. सलीम शेख यांची उपस्थिती होती

### राष्ट्रीय मतदार दिन :

२५ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारा 'सशक्त लोकशाही आणि जागरुक मतदार' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेत एकूण ०७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचा प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे कु. साक्षी जाधव, बी.ए.(आर.एस.) भाग-१, वैष्णवी अलगुलवार, बी.ए.(आर.एस.) भाग-२ व यश बुधबावरे, ११ वी एम. सी. व्ही. सी. यांना प्राप्त झाला.

### सडक सुरक्षा जागरुकता अभियान व अपघात मुक्त भारत अभियान :

सडक सुरक्षा जागरुकता अभियान व अपघात मुक्त भारत अभियानांतर्गत डिफेंस ड्रायव्हिंगचे व्हिडिओ पाहून त्यावर आधारीत प्रश्नमजुंषेमध्ये ०६ विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला.

**सोशल मिडिया समन्वयक नेमणूक :**

रासेयो अंतर्गत आयोजित विविध उपक्रमांचे सोशल माध्यमांवर व्यवस्थित सादरीकरण होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील श्री. भास्कर डेहनकर (बी. ए. आर. एस.) भाग-२ या स्वयंसेवकाची सोशल मिडिया समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली.

**जागतिक महिला दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा :**

०८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महिला कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय महिला : काल, आज आणि उद्या' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत उपस्थित होते तसेच उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार, ग्रंथपाल डॉ. वैशाली उगले राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत एकूण ०९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला यात कु. श्रद्धा महाजन, कु. मयुरी बोटकुले व कु. ऋतुजा उगावकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. वक्तृत्वस्पर्धेचे परीक्षण प्रा. संजीवनी वरफडे यांनी केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात पोस्टर स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन कु. श्रद्धा महाजन यांनी तर आभारप्रदर्शन कु. साक्षी जाधव केले. कार्यक्रमाला डॉ. मिलिंद माने प्रा. कीर्ती राऊत, प्रा. आकाश वारंजे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा :**

रासेयो स्वयंसेवकांना शिबिराबाबत विस्तृत माहिती देणे तसेच शिबिराची आचारसंहिता अवगत करून देण्याच्या उद्देशाने ११ मार्च २०२२ रोजी शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरूषोत्तम कालभूत, उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे व डॉ. मिलिंद माने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश देशपांडे यांनी, आभारप्रदर्शन डॉ. मिलिंद माने यांनी केले.


डॉ. राजेश देशपांडे
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. पुरूषोत्तम कालभूत
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

# नियमित उपक्रम

## क्षणचित्रे


### राष्ट्रीय सेवा योजना



आंतरराष्ट्रीय योग दिवस




आंतरराष्ट्रीय योग दिवस





रा.से.यो वर्धापन दिवस




राष्ट्रीय बालिका दिवस




स्वच्छता अभियान



स्वच्छता अभियान




संविधान दिवस




राष्ट्रीय युवा दिन




जागतिक महिला दिन




शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा

लोकमत

# जिल्ह्यात जागतिक महिला दिनानिमित्त रणरागिनींचा कार्याचा गौरव


## जागतिक महिला दिन साजरा

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत महिला दिवस साजरा

## संकल्प वसतिगृहाच्या संचालिका यांचा सन्मान



## जागतिक महिला दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा



## आर्वीतील संभाजी नगरात महिलांचा सत्कार

## आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

## शेतकरी महिलांचा गौरव

## गुरुदेव सेवा मंडळात जागतिक महिला दिन साजरा



लोकमत

# जाजू महाविद्यालयात रासेयो शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : येथील शिक्षा मंडळद्वारा संचालित श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष शिबिराबाबत स्वयंसेवकांना विस्तृत माहिती देणे, तसेच शिबिराची आचारसंहिता अवगत करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांसाठी शिबिरपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे व डॉ. मिलिंद माने यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कालभूत यांनी स्वयंसेवकांना शिबिराची दिनचर्या, शिबिरात राबविले



जाणारे विविध उपक्रम, शिबिराचे नियम व अटी, शिस्तपालन, पालकांची सहमती, शिबिरस्थळी स्वयंसेवकाची व्यवस्था याबाबत सविस्तर माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. पवार यांनी शिबिरस्थळी स्वयंसेवक महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने शिबिरार्थ्यांनी शिबिराचे नियम व अटी, शिस्तपालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. राजेश देशपांडे यांनी केले, आभार डॉ. मिलिंद माने यांनी मानले. साने गुरुजी यांच्या 'खरा तो एकची धर्म' या गीताने कार्यशाळेची सांगता झाली. कार्यशाळेला रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.